-: प्रेस नोट :-                    दिनांक ०४/११/२०२३

**मुंबई मधील प्रमुख उदयोगपती व इतर महत्वाचे व्यक्ती यांना shadabkhan@mailfence.com या मेल आयडी वरुन धमकी देवून खंडणी मागणा-या आरोपी इसमास मुंबई गुन्हे शाखेकडून अटक**

.......................................................................................................

मुंबई मधील प्रमुख उदयोगपती व इतर महत्वाचे व्यक्ती यांना **shadabkhan@mailfence.com** या मेल आयडी वरुन वेगवेगळया दिवशी एकुण ५ धमकीचे इ-मेल आलेले होते, ज्यामध्ये त्यांनी खंडणीची मागणी केलेली होती आणि खंडणीचे पैसे नाही दिले तर त्यांना मारण्याची धमकी दिली होती. सदर बाबत गांवदेवी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ३७०/२०२३, कलम ३८७,५०६(२) भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास मुंबई गुन्हे शाखेकडून करण्यात येत होता. सदर गुन्हयात केलेल्या तांत्रिक तपासावरून  एक आरोपी इसम नामे राजवीर जगतसिंह खंत,वय - २० वर्षे, व्यवसाय - शिक्षण, रा.ठी. - कलोल, गांधीनगर, गुजरात यास अटक करण्यात आलेली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखा मुंबई हे करीत आहे

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम,  मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशि कुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण-विशेष) श्री. दत्तात्रय नाळे, यांच्या मागदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. मिर्लीद काटे, पोनि श्री. समीर लोणकर, सपोनि श्री. प्रशांत सावंत, सपोनि श्री. राकेश देशमुख, सपोनि श्री. संदिप पाचांगणे, सपोनि श्री. संतोष शिरसेवाढ, सपोनि श्री. अमित उतेकर, पोउनि श्री. प्रकाश गवळी, पो.ह. निलेश शिर्के, पो.ह.  आनंद भंगाले,   पो.ह. योगेश उथळे, पो.ह. अमुल देशपांडे, पो.ह. शिवप्रसन्न पवार  यांनी पार पाडली आहे.